# प्रकरण :१ - मराठी भाषा आणि व्याकरण यांची ओळख।

घटक -१२

अ. भाषा (८)

१). भाषा म्हणजे काय ?
२). भाषेचे मुलभूत घटक
३). भाषेचे प्रकार
४). भारतातील भाषांचे कुळ किंवा गट
५). भाषेची उत्पत्ती
६). मराठी भाषेची उत्पत्ती
७). मराठी भाषेची लिपी
८). भाषेची वैशिष्ट्ये

ब. व्याकरण (४)

१). व्याकरण म्हणजे काय ?
२). मराठी व्याकरणाची परंपरा
३). व्याकरणाचे अभ्यास विषय
४). व्याकरणाच्या अभ्यासाचे महत्त्व

- भाषा आणि व्याकरण यांचा संबंध
- मराठी भाषेविषयी सामान्य माहिती

## १). भाषा म्हणजे काय ?

१). भाषा हा शब्द संस्कृतमधील भाष् या धातू पासून तयार झाला असून, त्याचा अर्थ बोलणे किंवा बोलण्या अर्थ लावणे असा होतो.

२). आपल्या मनातील भावना, कल्पना, विचार व अनुभव व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय.

३). भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व आन्वित ध्वनींचा समूह होय.

४). बोलणारा आणि ऐकणारा यांना जोडणारा पुल म्हणजे भाषा होय.

## २). भाषेचे मुलभूत घटक :-

१). वर्ण
२). अक्षर
३). शब्द
४). ~~वर्ण~~ वाक्य
५). (व्याकरण)

## १). वर्ण :-

१). वर्ण या शब्दाचे शब्दकोशात तीन अर्थ दिलेले आहेत.
i). रंग
ii). मुळाक्षरे
iii). आर्यांने समाजाचे केलेले चार भेद.

वरील दोन अर्थ व्याकरणात महत्वाचे आहेत.

VEDHA
Page No. :
Date : / /

2). बोललेले ध्वनी नष्ट होऊ नये म्हणून आपण ते रंगाने म्हणजेच वर्णाने लिहून ठेवतो म्हणून वर्ण असे म्हणतात.

3). दादोबा पांडुरंग तर्खडकर -
'अ' पासून 'ळ' पर्यंतच्या अक्षरांना वर्ण असे म्हणतात.
(महाराष्ट्र भाषेचे व्याकरण - 1836)

4). मो. रा. वाळंबे -
आपल्या तोंडावाटे निघणाऱ्या मुळ ध्वनीला आपण वर्ण असे म्हणतो. (सुगम मराठी व्याकरण व लेखन 1984)

5). मोरो केशव दामले -
मानवी मुखावाटे उच्चारलेल्या मुळ ध्वनींना वर्ण असे म्हणतात. (शास्त्रीय मराठी व्याकरण 1911)

- वर्णांना ध्वनीरुपे किंवा ध्वनीची प्रतिके असे म्हणतात.

- मुळ ध्वनी या मुक्त चंचल परिवर्तनशील असतात. तर वर्ण हे स्थिरबध्द तर काही प्रमाणात कृत्रिम असतात. थोडक्यात मुळ ध्वनीचे लिखित रुप म्हणजे वर्ण होय.

2). अक्षर :-

आपल्या आवाजाच्या किंवा ध्वनीच्या सांख्येतिक खुणेला अक्षर असे म्हणतात.

अक्षरांना ध्वनी चिन्हे असेही म्हणतात. कारण अक्षरे ही आपण उच्चारलेल्या ध्वनींची चिन्हे आहेत. ज्या वेळेस वर्णाचा उच्चार पूर्ण होतो त्यावेळेस त्याला अक्षर म्हणावे.

सर्व स्वर व अस्वरयुक्त व्यंजने ही अक्षरे आहेत.
उदा., अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, अॅ, ऐ, ऑ, ओ, औ, अं, अः
क, का, कि, की इत्यादी.

व्यंजनात स्वर मिसळल्यावर अक्षर बनते.
उदा., प् + अ = प , क् + अ = क

• अक्षर या शब्दाची फोड अ + क्षर अशी होते. म्हणून अक्षर म्हणजे 'नष्ट न होणे.'

अक्षर या शब्दाची अक्ष + र असेही फोड करतात. अक्ष म्हणजे डोळे र म्हणजे रमविणे अर्थात ज्या लेखणाच्या खुणा आपल्या डोळ्यांना रमवितात त्याला 'अक्षर' असे म्हणतात.

थोडक्यात, उच्चारलेले ध्वनी नष्ट होतात, ते नष्ट होऊ नये म्हणून ते लिपिच्या सहाय्याने लिहून ठेवतो, त्यामुळे ते चिरकाल टिकून राहतात. म्हणून त्याला अक्षर असे म्हणतात.

3). शब्द :-
ठराविक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समुहाला काही अर्थ प्राप्त झाला तर त्याला शब्द असे म्हणतात.
उदा., बदक.

शब्दाला व्याकरणात प्रकृती असे म्हणतात. तर शब्दाच्या रूपात बदल केल्यास त्याला पद म्हणतात. आणि पदालाच विकृती असे म्हणतात.

उदा., पाणी हा शब्द आहे तर शब्दाच्या रूपात बदल करून वाक्यात वापरल्यास त्याला पद म्हणावे.

4). वाक्य :-
पुर्ण अर्थाचे बोलणे म्हणजे वाक्य होय. किंवा अर्थपूर्ण शब्दसमूहाला वाक्य असे म्हणतात.
उदा., i). बदक पाण्यात पोहते.
ii). मुलांनी खरे बोलावे.

## ५). व्याकरण :-

व्याकरण म्हणजे काय ?

१). भाषेचे स्पष्टीकरण करणाऱ्या शास्त्राला व्याकरण असे म्हणतात
उदा.,
गणेश = गण + ईश हा शब्द बनलेला आहे. असे आपण संधीच्या नियमाने सांगतो म्हणजे स्पष्टीकरण करतो.

२). भाषेचे व्याकरण व्यवहार ज्या नियमांनी ठरवले जातात ते नियम स्पष्टीकरण करणारे शास्त्र म्हणजे 'व्याकरण' होय.
(संदर्भ - श्रीपाद भागवत)

३). महर्षी पतंजली यांनी व्याकरणाला शब्दानुशासन असे म्हटले आहे कारण व्याकरणमध्ये ~~म्हणजे~~ शब्दाला शिस्त लावली जाते.

४). व्याकरण हा शब्द वि + आ + कृ (करण). याचा शब्दशः अर्थ 'स्पष्टीकरण' असा होतो.

## ३). भाषेचे प्रकार :-

भाषेचे मुख्य प्रकार (2)
१). स्वाभाविक भाषा
२). कृत्रिम भाषा

इतर भाषेचे प्रकार (6)
१). मातृभाषा
२). बोलीभाषा
३). प्रमाणभाषा
४). संवराज्य व्यवहाराची भाषा
५). राजभाषा
६). अभिजात भाषा

## भाषेचे प्रकार (2)

- स्वाभाविक भाषा / नैसर्गिक भाषा
  - (आहाहा.) आवाज → मानव, पशु, पक्षी
  - हावभाव → हात, मान, डोळे, नाक
  - हालचाल → पान, पाणी, पंख, वीज
- कृत्रिम भाषा / सांकेतिक भाषा
  - ध्वनीमय / वाङ्मय / संकेतांची भाषा (वैखरी वाणी भाषा)
  - खुणांची सांकेतिक भाषा → अक्षर, चिन्ह, चित्र, नकाशे

हावभाव-(इंगित भाषा / देहबोली)

### भाषेचे इतर प्रकार :-

1). मातृभाषा :-

घरात बोलल्या जाणाऱ्या भाषेला मातृभाषा असे म्हणतात. जातीधर्मानुसार प्रत्येक कुटुंबाची वेगवेगळी भाषा असलेली दिसून येते. भारतामध्ये 1652 बोलीभाषा आहेत.

2). बोलीभाषा :-

दैनंदिन व्यवहारासाठी उपयोगात येणाऱ्या भाषेला बोलीभाषा असे म्हणतात. बोलीभाषा हा मानवी जिवनाचा जीवन अविष्कार झालेला आहे. त्यातून जीवनाला आपुलकी, प्रेम व्यक्त होत असते. महाराष्ट्रामध्ये प्रमाण मराठीच्या प्रदेशानुसार अनेक बोलीभाषा आहेत. जसे, मराठवाडी बोली, कोकणी बोली, अहिराणी बोली, खानदेशी बोली, वैदर्भी बोली, हलबी बोली.

3). प्रमाणभाषा :-

शासकीय कामकाजासाठी वापरल्यात येणाऱ्या भाषेला

प्रमाणभाषा असे म्हणतात. व्यवहारीक दृष्ट्या शुद्ध स्वरूपाची जी भाषा असते ती प्रमाणभाषा ही भाषा अनेक भाषांना सामावून घेते या भाषेचा वापर शिक्षण, न्यायालय, वैद्यकीय क्षेत्र, शासनाचे निर्णय, वृत्तपत्र, दूरदर्शन इत्यादीमध्ये केला जातो.

४). संघराज्य व्यवहाराची भाषा :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम 343 नुसार हिंदी आणि इंग्रजी या संघराज्य व्यवहाराच्या भाषा आहेत.

५). राजभाषा / प्रादेशिक / कार्यालयीन भाषा :-

भारतीय घटनेने भारतातील राज्यानुसार एकूण 22 भाषांना राजभाषेचा दर्जा दिलेला आहे.

त्या राजभाषा पुढीलप्रमाणे :-

| | राजभाषा | लिपी | राज्य |
|---|---|---|---|
| १). | डोंगरी | टकरी / देवनागरी | लडाख |
| २). | उर्दू | उर्दू | जम्मू आणि काश्मिर |
| ३). | काश्मिरी | देवनागरी / शारदा | जम्मू काश्मीर |
| ४). | पंजाबी | गुरुमुखी | पंजाब |
| ५). | हिंदी (H) | देवनागरी | U.P., M.P., राजस्थान, बिहार |
| ६). | गुजराती | देवनागरी | गुजरात |
| ७). | सिंधी | देवनागरी | गुजरात |
| ८). | मराठी | देवनागरी | महाराष्ट्र |
| ९). | कोकणी | देवनागरी | गोवा |
| १०). | कन्नड | कन्नड / द्राविड | कर्नाटक |
| ११). | आग्रा | मल्याळम | केरळ |
| १२). | तमिळ | तमिळ / द्राविड | तामिळनाडू |
| १३). | तेलगू | तेलगू / द्राविड | आंध्रप्रदेश |
| १४). | ओडिया | ओडिया / देवनागरी | ओडिशा |
| १५). | संथाळी | ओलचिकी | ओडिशा |
| १६). | बंगाली | देवनागरी / बंगाली | पश्चिम बंगाल |
| १७). | मैतेई (मणिपुरी) | मैतीमयक | मणिपूर |
| १८). | बोडो | देवनागरी | आसाम |

Page No. :
Date : / /

| | | | |
|---|---|---|---|
| १९). | आसामी | देवनागरी | आसाम |
| २०). | नेपाळी | देवनागरी | सिक्कीम |
| २१). | मैथिली | कैथी (मिथिलाक्षर) | बिहार |
| २२). | संस्कृत | देवनागरी | उत्तराखंडची द्वितीय राज्यभाषा |

६). अभिजात भाषा :-

अभिजात मराठी भाषा एक केंद्रशासनातर्फे एखाद्या भाषेला दिलेला दर्जा आहे. ज्या भाषेला प्राचीन अशी परंपरा आहे असते त्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन त्या भाषेच्या विकासासाठी प्रयत्न करत असते. अभिजात भाषा म्हणून दर्जा मिळवण्यासाठी केंद्रशासनातर्फे काही निकष पुढीलप्रमाणे ठरवलेले आहेत.

१). भाषेची प्राचीनता (भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षे असावे)
२). भाषेची मौलिकता व सलगता.
३). भाषेतील वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण
४). प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.

वरील निकष पूर्ण करणाऱ्या भाषेला केंद्रसरकारकडून भरीव असे अनुदान देऊन तिचा विकास केला जातो. आतापर्यंत एकूण पुढील सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आलेला आहे.

त - तमिळ - २००४
सं - संस्कृत - २००५
ते - तेलगू - २००८
क - कन्नड - २००८
म - मल्याळम - २०१३
उ - उडिया - २०१४

VEDHA
Page No. :
Date : / /

मराठी भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी 2012 साली एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल 2013 लाच राज्यशासनाला दिला. राज्यशासना तर्फे तो अहवाल केंद्राकडे देण्यात आला. मराठीला अभिजात भाषा देण्यासंदर्भाचा विचार केंद्रसरकारच्या विचाराधीन आहे.

## मराठी भाषेचे कुळ /गट

| आर्यभाषा (इंडो-युरोपियन) | द्रविडभाषा | ऑस्ट्रोएशियाची भाषा | शिनो तिबेटियन भाषा |
|---|---|---|---|
| 66-भाषा | 25-भाषा | 20-भाषा | 38-भाषा |
| गुजराती, मराठी, संस्कृत, पाली, हिंदी, बंगाली | कन्नड, तेलगू, तमिळ, मल्याळम | मुंडारी, खासी संथाली | लडाखी, नेवारी, बोरो, मणिपुरी, मिझो |
| (74) | (24) | | |

(74) + (24) → 98% लोक

2% लोक

एकूण भाषा = 20९

५). मराठी भाषेची उत्पत्ती :-

मराठी भाषेचा विकास -

1). संस्कृत - इ.स.पू. २३५० ते १५००

↓

2). प्राकृत - इ.स.पू. १५०० ते इ.स.पू. २००

↓

3). महाराष्ट्री - इ.स.पू. २०० ते इ.स. २००

↓

४). अपभ्रंश - इ.स. २०० ते इ.स. ६००

↓

५). मराठी - इ.स. ६००

# भाषेच्या उत्पत्तीचे प्रकार

१). प्राचीन ग्रंथांतील मराठीचा ऐतिहासिक उल्लेख

२). प्रत्यक्ष मराठी भाषेतील उल्लेख

३). मराठी शिलालेख

४). मराठी ताम्रपट

## १). प्राचीन ग्रंथांतील मराठीचा ऐतिहासिक उल्लेख :-

प्राचीन ग्रंथांमध्ये मराठी भाषेचा ऐतिहासिक उल्लेख आलेला आहे. त्यापैकी पहिला ग्रंथ पुढीलप्रमाणे-

1). कुवलयमाला (इ.स. ७७८) उद्योतनसूरी :-
या ग्रंथामध्ये उद्योतनसूरील यांनी वेगवेगळ्या 18 भाषा आणि लोक याबद्दलची माहिती दिलेली आहे. मराठी भाषा आणि मराठी माणूस याबद्दल लेखकाने पुर्णत: पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे.

"दढमडह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसीले य
दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे"

(बळकट ठेंगण्या, सावळ्या अंगाच्या, काटक, अभिमानी, भांडखोर, दिले घेतले असे बोलणाऱ्या मराठी लोकांस त्यांनी पाहिले.)

वरीलप्रमाणे मराठीचा उल्लेख ८ व्या शतकात आढळले असले तरी ५ व्या शतकातील नारदमुनी या ग्रंथातही मराठी भाषेवरून काव्य आलेले आहे.

## २). प्रत्यक्ष मराठी भाषेतील साहित्य / ग्रंथ :-

मराठी भाषेची उत्पत्ती पाहताना, प्रत्यक्ष मराठी भाषेमध्ये प्रत्यक्ष मराठी भाषेची उत्पत्ती केव्हा झाली याचा शोध घ्यावा लागेल. जसे इ.स. ९८८ साली कवी मुकुंदराज यांनी लिहिलेला विवेकसिंधू हा मराठीतील पहिला (काव्य) ग्रंथ मानला जातो. त्यानंतर महिम भटांचा लीळाचरित्र इ.स. १२८३, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी इ.स. १२९०, तसेच नामदेवांची अभंगवाणी इत्यादी साहित्यांचा आवर्जून उल्लेख करता येईल.

परंतू, ~~मराठी~~ अभिजात भाषा मराठी समितीने आपल्या अहवालाला राजा हाल यांचा 2000 वर्षापूर्वीचा 'गाथा सप्तशती' हा ग्रंथ सर्वात पहिला मानलेला आहे. गाथा सप्तशती या ग्रंथात एकूण ७०० गाथा असून, त्यात सामान्य लोकांचे जिवन चित्रीत केले आहे. या गाथेत शृंगाररस मोठ्या प्रमाणात आढळतो.

उदा., "दूरहूण तरुणसुरअं, विविह विलाससेंही करणसोहिल्लम,
दीओ वि तग्गामणो अजं पि तेल्लं ण लक्खेई।"

(तरुण युगुलांच्या विलासी रतीक्रिडा पाहताना, दिवा इतका तल्लीण झाला आहे की तेल संपले तरीही त्याला विझण्याचे भान राहिले नाही.)

## ३). मराठी शिलालेख :-

मराठीची उत्पत्ती सांगणारे अनेक शिलालेख आहेत. पंढरपूरचा शिलालेख, सासवडचा शिलालेख, परळचा शिलालेख इत्यादी. मराठी भाषेतील पहिला शिलालेख म्हणून कर्नाटकातील म्हैसूर जवळील श्रवणबेळगोळ येथील जो शिलालेख आहे तो मराठीतील पहिला शिलालेख मानला जातो. इ.स. ९८३ साली हा श्रवणबेळगोळचा शिलालेख निर्माण केला असून गोमटेश्वराच्या उर्फ बाहुबलीच्या पायथ्याशी मराठी भाषेतील दोन ओळी कोरल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे-

"श्री चावुण्डराय करविलये
गंगराजे सुताले करविलये"

श्रवणबेळगोळच्या शिलालेख हा पहिला शिलालेख मानला जात असला तरी अभिजात भाषा समितीने २२२० वर्षांपूर्वीचा नाणेघाटच्या शिलालेख हा मराठी भाषेतील सर्वात पहिला शिलालेख असल्याचे नमूद केले आहे. हा नाणेघाटचा शिलालेख पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे आहे. त्यावर महारथीने अक्षरे कोरलेली आहेत.

४). मराठी ताम्रपट :-

तांब्याचा पत्रावर कोरलेला मजकूर म्हणजे ताम्रपट होय. मराठी भाषेतील पहिला ताम्रपट म्हणून रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिवे आगर या गावी असलेला दिवे आगरचा (इ.स. १०६०) ताम्रपट हा आहे. या ताम्रपटावर वासुदेवभट्ट, नागरुद्रभट्ट, सुवर्ण इत्यादी अक्षरे कोरलेली आहेत. असे असले तरी इ.स. ६८० च्या ताम्रपटावर ५० प्रिथ्वी हे मराठीतील पहिले शब्द आढळून येतात.

* भाषेच्या उत्पत्तीचे सिध्दांत किंवा उत्पत्ती :-

१). भाषा : ईश्वरनिर्मित :-

भाषेची उत्पत्ती ही ईश्वरापासून झाली असे काही जणांचे मत आहे. तसा उल्लेख विविध धार्मिक ग्रंथात आलेला आहे.
उदा., ऋग्वेदामध्ये 'देवांनी वाग्देवीला निर्मिले आणि तिचं वाणी सारे बोलतात,' असे लिहिलेले आहे.

२). भाषा : राजनिर्मित :-

आदिमानवाने एकत्र येवून आपला नेता निवडला आणि त्या नेत्याने म्हणजे राजाने शब्दसंग्रहाचा कोश तयार

करून त्यांचा वापर समाजात केला आणि भाषेची निर्मिती झाली.

३). भाषा : समाजनिर्मित :-
समाजाने ध्वनींना संकेत किंवा चिन्हे देऊन भाषेची निर्मिती केली असा एक विचार आहे.

४). अनुकरण सिध्दांत : (Bow - Bow Theory) :-
डॉ. गायगर यांनी या सिध्दांतातून वस्तू, प्राणी यांच्या ध्वनी अनुकरणातून मानवाने शब्द बनविले आणि भाषा वापरली जाऊ लागली. या सिध्दांताची मॅक्समूलर यांनी Bow- Bow म्हणून चेष्टा केली आहे.

५). भावना अभिव्यक्ती सिध्दांत : (Pooh - pooh Theory) :-
कॉंडिलॅक यांनी या सिद्धांतातून भाषेच्या मुळाशी उद्‌गार (भावना) असतात असे म्हटले आहे. उदा., अरे !, अबब.

६). रणन सिध्दांत : (Ding - Dong Theory) :-
या सिध्दांतातून प्रोफेसर हेस्ट यांनी प्रत्येक वस्तूला नाद असतो त्या नादातून शब्दाची निर्मिती होत असते. असे म्हटले आहे. उदा., घंटी.

७). श्रमपरिहार सिध्दांत : (Yo he yo Theory) :-
या सिद्धांतातून लुडविग्नाद यांनी श्रम करताना मुखातून शब्द बाहेर पडले आणि भाषेची निर्मिती झाली. उदा., आपल्याकडे शेतकरी शेतात काम करताना भलरी दादा भलरी हे गीत गातात.

८). प्रेमगानमूलक सिध्दांत :- (Sing - Song Theory)
या सिध्दांतातून ओटो जेस्परसन यांनी प्रेम व्यक्त करत असताना मनुष्य गाने गातो, आपल्या जोडीदाराला खुश

करतो तेव्हा भाषा अस्तित्वात येते / निर्माण होते असे सांगितले.

८). इंगित सिध्दांत :- (Gestural Theory) :-
मानवी हावभावातून भाषा निर्माण झाली, असा विचार डॉ. राये यांनी या सिध्दांतातून मांडला.

१०). संपर्क सिध्दांत : (Contact Theory) :-
संपर्कात राहण्याच्या स्वाभाविक प्रेरणेतून भाषा निर्माण झाली असे मत प्रा. रेव्हन यांनी मांडले.

११). क्रिडासक्ती सिध्दांत : (Play way Theory) :-
लहान मूल तोंड व इतर अवयवांनी हालचाली करते. त्यात वाढ होऊन स्वरशब्द, यांचे उच्चारण करत असते आणि भाषेची निर्मिती होत असते, असे सर्वसाधारण मत आहे.

१२). समन्वय सिध्दांत : (Co-ordination Theory) :-
सर्व सिध्दांताचा समन्वय साधून एक सिध्दांत तयार करण्यात आला त्यास समन्वय सिद्धांत असे म्हणतात. हा सिद्धांत स्वीट यांनी मांडला.
उदा., प्रेमगाण मूलक व इंगित सिद्धांत यांनी एकत्रित केले आणि नवा विचार मांडला.

★ भाषेची वैशिष्ट्ये :-

१). परिवर्तनशीलता
२). स्थलकालातीतता (म्हणजे भाषेला स्थळ व काळाचे बंधन नसते)
३). भाषा एक संस्था सामाजिक आहे.
४). भाषा म्हणजे साहित्यातील आत्माविष्काराचे माध्यम असते.
५). भाषेला व्यक्तिबाह्य अस्तित्व नसते.
६). भाषा ही एक सहज प्रक्रिया आहे.

## मराठी भाषेची लिपी :- (देवनागरी)

- लिपू या धातूपासून लिंपणे हा शब्द रूढ झाला असून लिंपणे या शब्दावरून लिपू हा शब्द तयार आलेला आहे. आपण ज्या खुणांनी लेखन करतो त्या खुणांना लिपी असे म्हणतात. लिपीच्या शोधाने लेखन सोपे झाले आहे. मराठी भाषेची लिपी देवनागरी असून ती लिहिणाऱ्याच्या दृष्टीकोनातून डावीकडून उजवीकडे लिहिली जाते.
- देवनागरी लिपी ही उभ्या, आडव्या, तिरकस, गोलाकार रेषांनी बनलेली आहे. देवनागरी लिपीतील अक्षरांवर आडवी रेष ओढली जाते. त्यांना शिरोरेषा असे म्हणतात. देवनागरी लिपी लहान मुलांना सुद्धा आकलन करण्यास सोपी असल्याने तिला बाळबोध लिपी असेही म्हणतात.
- देवनागरी लिपी ही आर्यांची लिपी आहे. आर्य हे स्वतःला देव समजत असत. ते नगरामध्ये रहायचे म्हणून नगरामध्ये राहणाऱ्या देवांनी तयार केलेल्या लिपीला देवनागरी लिपी असे म्हणतात.
- ब्राम्हीण लिपीपासून देवनागरी लिपी तयार झाली असून या लिपीत मराठीबरोबरच संस्कृत, पाली, हिंदी, गुजराती, बंगाली, पंजाबी इ. भाषांचे लेखण केले जाते.
- देवनागरी लिपी काही काळ मुरड घालून लिहिली जात असे, म्हणून तिला मोडी लिपी असे म्हणतात. मोडी लिपीलाच धाव लिपी असे म्हणतात. ब्राम्ही लिपी व खरोष्टी (गान्धारी) या भागातील प्राचीन लिपी आहे.

## व्याकरण :-

भाषेचे स्पष्टीकरण करणाऱ्या शास्त्राला व्याकरण असे म्हणतात.

- मराठी व्याकरणाची परंपरा :-

भारतामध्ये व्याकरणाची परंपरा खूप जुनी आहे. प्राचीन काळामध्ये पानीनी या व्याकरणकाराने संस्कृत भाषेचे

व्याकरण लिहिले आहे. एकूण ६ वेदांगामध्ये व्याकरण हे एक स्वतंत्र अंग म्हणून अस्तित्वात होते. मात्र मराठी व्याकरणाची परंपरा अगदी अलीकडच्या काळातील आहे. म्हणजे इंग्रजी राजवटीमध्ये मराठी व्याकरणाची चर्चा केली जाऊ लागली आहे. इ. स. १८०५ साली विल्यम कॅरी या इंग्रज भाषा पंडितांनी 'द ग्रामर ऑफ मराठा लँग्वेज' नावाचा मराठी व्याकरणातील ग्रंथ. इंग्रजी भाषेमधून लिहिला पुढे १८३६ मध्ये मराठी भाषेमधूनच दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी महाराष्ट्र भाषेचे व्याकरण हा ग्रंथ लिहिला म्हणून त्यांना मराठी भाषेचे पानीनी म्हणतात. त्याचवर्षी गंगाधर शास्त्री फडके यांनीही महाराष्ट्र भाषेचे व्याकरण हा ग्रंथ लिहिला. त्यानंतर १९११ या वर्षी मो. रा. वाळंबे केशव दामले यांनी 'शास्त्रीय मराठी व्याकरणाची लिहिले. १९३३ ला ग. ग. केळकर यांनी मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे, १९५१ ला म. पा. सबनिस यांनी आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण, 1989 ला मो. रा. वाळंबे यांनी सुगम मराठी व्याकरण व लेखन हा ग्रंथ लिहिला.

व्याकरणाचे प्रमुख अभ्यासविषयक महत्त्व :-

व्याकरणाचे प्रमुख अभ्यासविषयक ३ घटक -

1. वर्णविचार
2. शब्दविचार
3. वाक्यविचार

व्याकरणाचे महत्त्व :-

वेगवेगळ्या दृष्टिकोनातून व्याकरणाला विशेष महत्त्व आहे. जसे, अचूकलेखन, बिनचूक उच्चार वाक्यातील शब्दांचा योग्य क्रम लावणे अनेक बोलीभाषकांना एकत्र आणून त्यांच्यात संवाद घडविणे किंवा शासन स्तरावरील विविध कामकाज यामध्ये व्याकरणाची आवश्यकता असते.

Page No. :
Date : / /

## भाषा आणि व्याकरण यांचा संबंध :-

व्याकरण हे एक भाषेचे अंग आहे. शुध्द कसे बोलावे किंवा लिहावे यांची माहिती व्याकरण सांगत असते. भाषेला शिस्त लावण्याचे काम व्याकरणशास्त्र करत असते. म्हणून महर्षी पतंजली यांनी व्याकरणाला 'शब्दानुशासन' (अनुशासन म्हणजे शिस्त) असे असले तरी भाषा बदलानुसार व्याकरणाला आपल्या नियमामध्ये सुरड घालावी लागते. कारण भाषा ही नदीच्या प्रवाहीसारखी असते. भाषा आणि व्याकरण हे परस्पर पूरक आणि परस्परावलंबी आहेत.

## मराठी भाषेविषयी सामान्य माहिती :-

- मराठी भाषेतील पहिली कवयित्री महदंबा आहे.
- ययाती ही कादंबरी वि. स. खांडेकर यांनी लिहिली आहे.
- गाडगेबाबा यांचे पूर्ण नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर.
- नाचरे मोरा' या कवितेचे कवी ग. दि. माडगूळकर.
- नटसम्राट हे नाटक वि. वा. शिरवाडकर यांनी लिहिले.
- बालकवी यांचे पूर्ण नाव त्र्यंबक बापूजी ठोंबरे.
- राम गणेश गडकरी हे गोविंदाग्रज यांचे टोपणनाव आहे
- किर्तन परंपरेचे जनक संत नामदेव हे आहेत.
- राम स्वामींनी सुख:कर्ता दुख:कर्ता ही आरती लिहिली
- 27 फेब्रुवारीला मराठी दिवस साजरा केला जातो.